प्रेसनोट दि. २८/८/२०१८

## देशी बनावटीचे दोन पिस्टल व चार काडतुसे बाळगणाऱ्या अट्टल सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा युनिट १ च्या टिमने केली अटक

गुन्हे शाखा, युनिट १ पुणे शहरचे अधिकारी व कर्मचारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हयातील आरोपींचा खडक व फरासखाना पोलीस स्टेशनचे हद्दीत शोध घेत असतांना पोलीस नाईक सचिन जाधव यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम दत्तवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीत पर्वती पायथा येथे सार्वजनिक रोडवर दोन देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल बेकायदेशीरपणे घेवून उभा आहे. सदरची बातमी युनिट १चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव (अतिरीक्त कार्यभार) यांना कळविली असता, त्यांनी लागलीच कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिले.

लागलीच युनिट १ कडील पोलीस उप निरीक्षक हर्षल कदम व स्टाफ यांनी सदर ठिकाणी जावून छापा टाकून बातमी प्रमाणे एका इसमांस ताब्यात घेवून त्याचे नांव पत्ता विचारता त्याने आपले नांव पत्ता सुनिल उर्फ चॉकलेट सुन्या किशोर डोकेफोडे, वय ३३ वर्षे, रा. लेन नं. ८, घर नं. २१६, जयभवानीनगर, पर्वती पायथा,पुणे - ९ असे असलेचे सांगीतले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे कब्जात दोन देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व चार काडतुसे असा एकुण किं.रु. १,००,२००/- माल जप्त करण्यात आला आहे.

सदरचा आरोपी हा अट्टल सराईत गुन्हेगार असून त्याचेवर यापूर्वी **खूनाचे २, खूनाचा प्रयत्न ६, जबरी चोरीचे ७, घरफोडीचे ५, चोरीचे १ व आर्म्स ॲक्टचे ४** असे मिळून **एकुण २५ गुन्हे** दाखल आहेत. सदरचा आरोपी हा रात्रीचे वेळी त्याचे स्वतःचे घरी कमी, परंतू जागा बदलून रहात असलेबाबत समजले आहे. सदरचा आरोपी हा दत्तवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ३३२/२०१७ भादविक. ३०७ व राईटच्या गुन्हयामध्ये मागील ८ महिन्यापासून पाहिजे आरोपी होता. सदरचा आरोपी हा अत्यंत शिताफीने पर्वती पायथा या भागात गेल्या आठ महिन्यापासून जागा बदलून रहात होता.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे सो. पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, (अतिरीक्त कार्यभार), पो उप निरी. हर्षल कदम, दिनेश पाटील, पो.ना. सचिन जाधव, इम्रान शेख, इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, सुधाकर माने, पो.हवा. रिजवान जिनेडी, सुभाष पिंगळे, प्रशांत गायकवाड, उमेश काटे, अशोक माने, तुषार खडके, संजय बरखडे, पो.शि. तुषार माळवदकर, गजानन सोनुने, यांनी केली आहे.

पोलीस उप-आयुक्त<br>
गुन्हे,पुणे शहर




गुन्हे शाखा,
युनिट १
पुणे शहरची
कामगिरी